- 3 NOV 2023

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# बहुसांस्कृतिक समाजात एकजिनसीपणासाठी अनुवाद महत्त्वाचा

## डॉ. ज्ञानेश्वर मुळे; विद्यापीठात अनुवादकांच्या राष्ट्रीय परिषदेस प्रारंभ

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

विविध संस्कृतींमध्ये सुसंवाद प्रस्थापित करण्याचे कार्य अनुवादाच्या माध्यमातून होते. बहुसांस्कृतिक समाजामध्ये एकजिनसीपणा कायम राखण्याच्या दृष्टीने अनुवाद व अनुवादकांचे स्थान महत्त्वाचे आहे, असे प्रतिपादन राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाचे सदस्य डॉ. ज्ञानेश्वर मुळे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठात भारतीय अनुवाद साहित्य, भुवनेश्वर यांच्या सहकार्याने अनुवादकांच्या दोन दिवसीय राष्ट्रीय परिषदेचे उद्घाटक म्हणून ते बोलत होते. बीजभाषक म्हणून



हैदराबादच्या इंग्रजी व विदेशी भाषा विद्यापीठाच्या माजी प्र-कुलगुरू डॉ. माया पंडित, तर अध्यक्ष म्हणून कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के उपस्थित होते.

डॉ. मुळे म्हणाले, भारतासारख्या बहुसांस्कृतिक व बहुभाषिक देशामध्ये जिथे संविधानातच २२ भाषांची नोंद आहे. जिथे इतक्या भाषांमधील साहित्य प्रकाशित करणारी प्रचंड व्याप असणारी साहित्य अकादमी आहे, तिथे भाषा ही दोन माणसांत केवळ संवादाचे नव्हे, तर या सर्व संस्कृतींना जोडणाऱ्या पुलाचे काम करते. त्याद्वारे माणसे एकमेकांशी जोडली जातात आणि देशाची एकता, अखंडता कायम राहण्यास मदत होते.

डॉ. पंडित यांनी अनुवाद या साहित्य प्रकारास व अनुवादकांना साहित्य विश्वात मिळत असलेल्या दुय्यम वागणुकीबद्दल खंत व्यक्त केली.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, अनुवादाच्या प्रक्रियेकडे उद्योग-व्यवसाय संधीच्या दृष्टिकोनातून पाहण्याची गरज आहे. उद्योग-व्यवसायांसाठी अनुवाद व अनुवादाचा उद्योग-व्यवसाय या दोन्ही अंगांनी युवकांनी अनुवादाकडे संधी म्हणून पाहण्याची गरज आहे.

विदेशी भाषा विभागाच्या प्रमुख डॉ. मेघा पानसरे यांनी प्रास्ताविक केले. मराठी अधिविभाग प्रमुख डॉ. नंदकुमार मोरे यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. 'भारतीय अनुवाद साहित्य'चे सचिव शरदचंद्र आचार्य यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- 3 NOV 2023

महासत्ता

# शिवाजी विद्यापीठात आजपासून दोन दिवसीय राष्ट्रीय परिषद

कोल्हापूर,ता.१(प्रतिनिधी)-

शिवाजी विद्यापीठ आणि भारतीय अनुवाद साहित्य, भुवनेश्वर, ओडिसा यांच्या संयुक्त विद्यमाने ता. २ व ३ नोव्हेंबर, २०२३ रोजी 'भाषांतरकारांची राष्ट्रीय परिषद' आयोजित केली आहे. शिवाजी विद्यापीठाच्या वि.स.खांडेकर, भाषाभवन सभागृहात विविध भारतीय भाषांतील भाषांतरकार यांच्या उपस्थितीत ही परिषद संपन्न होणार आहे.

या परिषदेचे उद्घाटन भारत सरकारच्या मानवाधिकार आयोगाचे सदस्य आणि ख्यातकीर्त लेखक डॉ. ज्ञानेश्वर मुळे यांच्या हस्ते व मा. कुलगुरू प्रा.डॉ.डी.टी.शिर्के यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे. इफ्लू युनिव्हर्सिटी हैदराबादच्या माजी कुलगुरू, भाषांतरकार डॉ. माया पंडित या परिषदेचे बीजभाषण करणार आहेत. तसेच भारतीय अनुवाद साहित्य संस्थेचे सचिव सरत चंद्र आचार्य हे उपस्थित राहणार आहेत. या दोन दिवसीय राष्ट्रीय भाषांतर परिषदेत विविध भारतीय भाषांमधील भाषांतरकार विविध विषयावर विचार मांडतील. या परिषदेस महाराष्ट्र, ओडिसा, आसाम, प.बंगाल, छत्तीसगड, कर्नाटक या राज्यातील १५० भाषांतरकार उपस्थित राहणार आहेत. भाषा, साहित्य आणि भाषांतरविषयक अभ्यास व आस्था असणाऱ्या सर्वांनी या परिषदेस उपस्थित राहण्याचे आवाहन परिषदेचे समन्वयक डॉ. नंदकुमार मोरे यांनी केले आहे.

-3 NOV 2022

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# जिजाऊ याच शिवाजी महाराजांच्या गुरू

## प्रवीण गायकवाड : 'सकाळ' प्रकाशनच्या 'राजमाता जिजाऊ' पुस्तकाचे लोकार्पण

पुणे, ता. २ : छत्रपती शिवाजी महाराजांना त्यांच्या वयाच्या बाराव्या वर्षीच वडील शहाजीराजे यांनी बंगळूर येथे नेऊन ३२ कलांचे प्रशिक्षण दिले. राजमाता जिजाऊ या उत्तम घोडेस्वारी करत असत आणि तलवारही चालवत असत. शिवाजी महाराज हे शहाजीराजे आणि राजमाता जिजाऊ यांच्यामुळेच विविध क्षेत्रात पारंगत झाले, त्यामुळे राजमाता जिजाऊ याच शिवाजी महाराजांच्या गुरू आहेत. आतापर्यंत महाराजांचे गुरू, पालक आणि शिक्षक म्हणून उल्लेख केला जात असलेल्या नावांचा शिवाजी महाराजांशी काहीही संबंध नसल्याचे संभाजी ब्रिगेडचे प्रदेशाध्यक्ष प्रवीण गायकवाड यांनी गुरुवारी (ता. २) येथे एका जाहीर कार्यक्रमात बोलताना सांगितले.



पुणे : सकाळ प्रकाशनच्या वतीने प्रकाशित करण्यात आलेल्या 'राजमाता जिजाऊ : सकलजनवादी क्रांतीच्या शिल्पकार' या पुस्तकाचे प्रकाशन करताना (डावीकडून) श्रीराम पवार, डॉ. प्रकाश पवार, प्रतापराव पवार, डॉ. सदानंद मोरे आणि प्रवीण गायकवाड आदी.

'सकाळ' प्रकाशनच्या वतीने प्रकाशित करण्यात आलेल्या डॉ. प्रकाश पवार लिखित 'राजमाता जिजाऊ : सकलजनवादी क्रांतीच्या शिल्पकार' या पुस्तकाचे प्रकाशन गुरुवारी गायकवाड यांच्या हस्ते करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. सकाळ माध्यम समूहाचे अध्यक्ष प्रतापराव पवार या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. यावेळी या पुस्तकाचे लेखक डॉ. प्रकाश पवार, ज्येष्ठ पत्रकार श्रीराम पवार, संत साहित्याचे अभ्यासक डॉ. सदानंद मोरे आदी उपस्थित होते.

गायकवाड पुढे म्हणाले, "शहाजीराजे, शिवाजी महाराज यांच्यावर लिहिलेल्या आणि छत्रपती संभाजी महाराजांनी लिहिलेल्या ग्रंथांत कोठेही शिवाजी महाराजांचे गुरू, पालक किंवा शिक्षक म्हणून उल्लेख केला जात असलेल्यांच्या नावांचा उल्लेख नाही. डॉ. प्रकाश पवार यांनी लिहिलेल्या राजमाता जिजाऊ या पुस्तकातही हे उल्लेख नाहीत. त्यामुळे या पुस्तकाचे अनन्यसाधारण महत्त्व आहे. जिजाऊंप्रमाणेच दिवंगत शारदाबाई पवार यांनी शरद पवार, प्रतापराव पवार यांच्यासारखे नामवंत व्यक्ती घडवले. शारदाबाईंच्या प्रेरणेमुळे घडलेली त्यांची मुले सध्या विविध क्षेत्रात काम करत आहेत."

हे पुस्तक अत्यंत अभ्यासपूर्ण आणि सखोल संशोधन करून लिहिले आहे. यासाठी त्यांचे अभिनंदन आणि मनःपूर्वक आभार मानतो, अशा शब्दांत प्रतापराव पवार यांनी लेखक प्रकाश पवार यांचे कौतुक केले आणि प्रत्येकाने हे पुस्तक वाचावे, असे आवाहनही केले. सकाळ प्रकाशनच्या दीपाली चौधरी यांनी प्रास्ताविक केले. लेखक प्रकाश पवार, ज्येष्ठ पत्रकार श्रीराम पवार यांचेही भाषण झाले. प्रसाद बेडेकर यांनी सूत्रसंचालन केले.

### मराठी तरुणांना सल्ला

■ "राजमाता जिजाऊ आणि छत्रपती शिवाजी महाराज यांनी सातत्याने उणिवा व कमतरता शोधून, त्यावर उपाययोजना केल्या. यासाठी शिवाजी महाराजांनी व्यापारही केला. बोटीही बांधल्या. यातून मिळालेला महसूल त्यांच्या वारसदारांना पुढची २५ वर्षे पुरू शकला. मराठी तरुणांनीसुद्धा राजमाता जिजाऊ आणि छत्रपती शिवाजी महाराजांप्रमाणे बदलत्या काळानुसार मार्ग बदलण्याची भूमिका घेतली पाहिजे. याबाबतचा धडा राजमाता जिजाऊ आणि शिवाजी महाराज यांच्याकडून घेतला पाहिजे", असा सल्ला प्रतापराव पवार यांनी तरुणांना दिला. छत्रपती शिवाजी महाराज यांचे स्वराज्याचे स्वप्न प्रत्यक्षात उतरवण्यासाठीची खरी प्रेरणा या राजमाता जिजाऊ आहेत. जिजाऊंनी दिलेल्या प्रेरणांचा परिणाम म्हणजे छत्रपती शिवाजी महाराज आहेत, असेही पवार यांनी यावेळी सांगितले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- 3 NOV 2023
पुढारी

# विद्यापीठ सत्र परीक्षेत ४०० कॉपी प्रकरणे

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या ऑक्टोबर-नोव्हेंबर हिवाळी सत्रातील पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या परीक्षेंतर्गत आजअखेर सुमारे ४०० कॉपी गैरमार्ग प्रकरणे आढळून आली.

गुरुवारी मास्टर ऑफ कॉमर्स, कॉम्प्युटर ॲप्लिकेशन, बॅचलर ऑफ आर्टस्, एज्युकेशन, मास्टर आर्टस् योगशास्त्र, बिझनेस ॲडमिनिस्ट्रेशन, मास्टर ड्रामास्टिक, रूरल स्टडीज, मास्टर आर्टस् (होम सायन्स), वूमेन स्टडीज आदी १६ अभ्यासक्रमांच्या परीक्षा सुरळीत झाल्या. ४ हजार ४५१ विद्यार्थ्यांपैकी ४०२ विद्यार्थी गैरहजर होते. भरारी पथकाकडून सांगली ४, कोल्हापूर २७, सातारा २२ असे तिन्ही जिल्ह्यांतून ५३ गैरप्रकारांची प्रत्यक्ष नोंद परीक्षा प्रमाद समितीमार्फत करण्यात आल्याचे परीक्षा व मूल्यमापन मंडळ संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी सांगितले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
3 NOV 2000
तरुण भारत

# विद्यापीठ परीक्षेत ५३ गैरप्रकार उघडकीस

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ अंतर्गत पदवी व पदव्युत्तरच्या परीक्षेदरम्यान ५३ कॉपीचे प्रकार उघडकीस आले. गुरूवारी १६ विषयांच्या ४ हजार ४९ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. या परीक्षेत भरारी पथकाकडून सांगलीत ४, कोल्हापूरात २७, साताऱ्यात २२ असे तिन्ही जिल्ह्यातून ५३ कॉपीचे प्रकार उघडकीस आले. भरारी पथकाकडून नोंदीत दोषी विद्यार्थ्यांवर परीक्षा प्रमाद समितीमार्फत कारवाई करण्यात येणार आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
3 NOV 2023
सकाळ

# विभागीय टेबल-टेनिस स्पर्धेत कमला महाविद्यालय चौथे

▶ सकाळ वृत्तसेवा

स्थानिक क्रीडा वृत्त

कोल्हापूर, ता. २ : शिवाजी विद्यापीठांतर्गत झालेल्या विभागीय टेबल-टेनिस स्पर्धेत कमला महाविद्यालयाच्या संघाने चौथा क्रमांक मिळवला. विवेकानंद महाविद्यालय येथे स्पर्धा झाली. संघात पूजा खुडखुडिया, सानिका मस्कर, प्राज्वली चौगुले, साक्षी खडसे, समृद्धी फडतारे यांचा संघात समावेश असून, आंतर विभागीय स्पर्धेसाठी संघाची निवड झाली आहे. त्यांना ताराराणी विद्यापीठाचे कार्यकारी अध्यक्ष डॉ. क्रांतिकुमार पाटील, प्राचार्य डॉ. तेजस्विनी मुडेकर यांचे प्रोत्साहन, तर शारीरिक शिक्षण संचालक ज्योती लंगरे यांचे मार्गदर्शन मिळाले.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठांतर्गत झालेल्या विभागीय टेबल-टेनिस स्पर्धेत यश मिळविणारा कमला महाविद्यालयाचा संघासोबत कार्यकारी अध्यक्ष डॉ. क्रांतिकुमार पाटील, प्राचार्य डॉ. तेजस्विनी मुडेकर, ज्योती लंगरे आदी उपस्थित होते.**